<u>**नियमित दिवाणी मुकदमा क्र.४४९/२०१२ मधील नि.५१ वरील आदेश**</u>

CNR No.MHST150011962012

१. प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी यांनी त्यांच्या विरूध्द दि. २८.०७.२०२३ रोजी पारित झालेला '*उलटतपास नाही"* चा आदेश रद्दबातल होवून मिळणेसाठी केलेला आहे.

२. वादी यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल केले आहे. वादी व प्रतिवादी यांच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

३. प्रतिवादीच्या कथनानुसार, प्रतिवादी यांनी वादी यांचे साक्षीदाराचा उलटतपास घेतला नाही म्हणून त्यांच्या विरूध्द दि.२८.०७.२ ०२३ रोजी उलटतपास नाही असा आदेश पारित झालेला आहे. प्रतिवादीच्या कथनानुसार, सदर दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.१ व ३ यांनी त्यांचे विधीज्ञामार्फत नि.१४ वर कैफियत दाखल केली आहे. परंतु त्यांचे विधीज्ञ सन २०२१ मध्ये मयत झाले व याबाबतची माहिती त्यांना मिळाली नाही. प्रतिवादी हे न्यायलायात हजर राहू शकले नाहीत. प्रतिवादी यांच्या कथनानुसार, प्रतिवादी यांना वादीच्या साक्षीदाराचा उलटतपास घेणेस परवानगी न दिल्यास त्यांचे कशानेही न भरून येणारे असे नुकसान होणार आहे. तसेच प्रतिवादी यांना वादीचा उलटतपास घेणेची संधी दिल्यास वादीचा दावा गुणगुणावर निकाली होण्यास मदत होणार आहे. म्हणून प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज मंजूर करणेची विनंती केली.

४. वादी यांनी सदरील अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल करून अर्जास हरकत घेतली आहे व कथन केले आहे की, प्रतिवादी खुप वेळा संधी दिलेली आहे. त्यामुळे वादी यांनी सदरचा अर्ज नामंजूर करणेची विनंती केली.

५. प्रतिवादीच्या अर्जातील कथनांचा, वादी यांच्या म्हणण्याचे अवलोकन केले. वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांच्या अर्जाचे वादी म्हणण्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादी यांच्या विरूध्द दि.२८.०७.२०२३ रोजी उलटतपास नाही असा आदेश पारित झालेला आहे. त्यानंतर प्रस्तुत दाव्यात उलटतपास घेणेसाठी ब-याच तारखा झाल्या असल्याचे दिसून येत आहे. एकंदरीत दाव्याचे स्वरूप व वादी यांनी दाव्यात केलेली मागणी

विचारात घेता प्रतिवादी यांना वादीचा उलटतपास घेणेची शेवटची एक संधी देणे योग्य व संयुक्तिक होईल. मात्र प्रतिवादी यांना त्यांच्या विरूध्द पारित झालेला उलटतपास नाही असा आदेश रद्दबातल न झाल्यास त्यांचे कशानेही न भरून येणारे नुकसान होणार आहे तर वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. मात्र याठिकाणी हे नमूद करणे आवश्यक आहे की, वादी यांना प्रतिवादी यांचे साक्षीदारांचा उलटतपास घेणेस जो विलंब झालेला आहे त्यासाठी प्रतिवादी यांनी वादी यांना खर्चाची रक्कम खालील आदेशाप्रमाणे देणे उचित ठरणार आहे. म्हणून हे न्यायालय खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. नि. ५१ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी यांनी खर्चाची रक्कम रू.५००/- पुढील तारखेपर्यंत न्यायालयात भरणेची आहे अथवा वादीला देणेची आहे.

स्थळः वडूज.
दि १५.१२.२०२३

सही/-
(जी. एम. निमदेव )
दुसरे सह–दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
वडूज. (न्यायालय क्र.२)